नांदेड जिल्ह्यातील दुधउत्पादक शेतकऱ्यांच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीचा अभ्यास (२०११-१२ ते २०२१-२२)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या वाणिज्य आणि व्यवस्थापन विद्याशाखेतंर्गत वाणिज्य विषयातील पीएच. डी. पदवीच्या नियोजित संशोधनासाठी सादर करावयाचा आराखडा

संशोधक विद्यार्थी

स्वानंद पंडितराव शिंदे

M.com., B.ED., D.T.L.

संशोधक मार्गदर्शक

डॉ. अतिश उ. राठोड

M.com., B.ED.,G.D.C.&A., Ph.D.

सहाय्यक प्राध्यापक

नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालय, नांदेड.

सप्टेंबर : २०२३

नांदेड जिल्ह्यातील दुधउत्पादक शेतकऱ्यांच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीचा अभ्यास

१) प्रस्तावना :-

भारतात प्राचीन काळापासून गाईचे फार महत्त्व आहे. त्याचबरोबर गाई व म्हशी ह्या प्राण्यांचा शेतीतील कामासाठी उपयोग केल्याचे उल्लेख आढळतात. हिंदू संस्कृतीत माता समजली जाणारी गाय देवी-देवतांच्या पूजेसाठी लागणारे दूध, दही, तूप गाईच्या दुधापासून बनविले जात असत. ऋग्वेदात गायीला अघन्या म्हटले आहे. गाय अद्वितीय असल्याचे यजुर्वेद सांगतो. त्याप्रमाणे अथर्ववेदात गायीला संपत्तीचे घर म्हटले आहे. या सर्वांवरून गाईचे महत्त्व समजते. कौटिल्याने इसवी सन पूर्व ३२१ ते २९६ या काळातील आपल्या ग्रंथात पशुपालनाबरोबरच दुधव्यवसायाचे महत्त्व पटवून दिलेले आहे. भगवान श्रीकृष्णाने बालपणी दही दूध आणि लोणी चोरल्याच्या दंतकथा आढळतात. आपल्या देशात फार पूर्वीपासूनच जनावरांचा उपयोग शेती व्यवसायासाठी केला जातो. शेतीकामासाठी बैल मिळावे या उद्देशाने गाईंचे पालन पोषन केले जात असत.

प्राचीन काळापासून दुधव्यवसायाकडे शेतीपूरक व्यवसाय म्हणून पाहिला जातो. भारतातील बहुतांश शेतकरी हे आजही शेतीसाठी पावसाच्या पाण्यावर शेती करतात त्यामुळे त्यांचे उत्पन्न फार कमी आहे. तसेच योग्य बाजारभावही मिळत नसल्याने फार मोठी समस्या निर्माण होते. त्यामुळे शेतकरी आपला घरसंसार चालवण्यासाठी शेतीबरोबरच जोडधंदा म्हणून दुधव्यवसायाला प्राधान्य देतात. शेतीबरोबर करण्यात येणारा जोडधंदा म्हणून दुधव्यवसाय शेतकऱ्यांना त्यांच्या सोयीचा व्यवसाय आहे. कारण, दुधव्यवसायासाठी सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे जनावरांचा चारा हा त्यांच्याकडे सहज उपलब्ध होत असतो. त्यामुळे हळूहळू शेतकरी हा दुधव्यवसायाकडे वळत चाललेला आहे. भारत हा कृषिप्रधान देश आहे. आजही ग्रामीण भागातील लोक हे शेतीवर अवलंबून आहेत.

औद्योगिक क्रांती होत असली तरी आपल्या देशातील शेती क्षेत्राचे महत्त्व आजही कायम आहे, दुधव्यवसाय हा एकेकाळी शेतीशी निगडित असणारा छोटा जोडधंदा; पण

आज तो शेती व्यवसायाच्या अनेक पटीनी मोठा झाला आहे. भविष्यात जगाच्या पाठीवर अनेक प्रकारचे व्यवसाय येतील आणि जातील; पण दुधव्यवसाय कधीही न संपुष्टात येणारा व्यवसाय आहे. शेतीला बरोबर घेऊन जाणारा कोणता व्यवसाय असेल तर तो दुधव्यवसाय हाये. या व्यवसायाने अनेक संस्कृत्या पाहिल्या आहेत. जगाच्या कानाकोपऱ्यात पसरलेला हा व्यवसाय आहे. खेड्यापासून ते शहरापर्यंत, निरक्षरापासून ते पदवीधारकापर्यंत, महिलांपासून ते पुरूषांपर्यंत सर्व जाती-धर्माच्या समाजापासून गरीब श्रीमंत अशा सर्वांचा सहभाग या व्यवसायात आहे.

महाराष्ट्राचा विचार केला तर ध्धवलक्रांतीङ नंतर महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाचा आर्थिक चेहरामोहरा बदल्याचे दिसून येते. महाराष्ट्रात सहकारी क्षेत्राच्या माध्यमातून दुधव्यवसायाचा फार मोठा विकास झाल्याचे आढळते. विशेषत: ग्रामीण भागात तरी दुधव्यवसायाला व्यावसायिक व निश्चित उत्पन्नाची हमी देणारा व्यवसाय म्हणून पाहिले जाऊ लागले. सन १९६० पासून ग्रामीण भागातील दूध संकलित करून शहरी भागात पुरवठा करण्याची योजना सुरू झाली, सन १९७० पासून संकरित गाईची निर्मिती या कार्यक्रमामुळे महाराष्ट्रातील दुधउत्पादनात मोठी वाढ झाली. देशपातळीवरील दुधाची उपलब्धता प्रतिदिन २९९ ग्रॅम प्रतिमानसी, तर राज्याची उपलब्धता २१५ ग्रॅम प्रतिमानसी इतकी असून देशाच्या तुलनेत मानसी प्रतिदिन ८४ ग्रॅम इतका तुटवडा आढळतो. सन २०११ च्या जनगणनेनुसार राज्याची लोकसंख्या सुमारे ११.२ कोटी असून सध्या महाराष्ट्रात २४२ लाख लिटर इतके दूध उत्पादन होत आहे.

२) नांदेड जिल्ह्याबाबत माहिती :-

महाराष्ट्र व मराठवाड्याच्या आग्नेय दिशेच्या सीमेवर असलेला हा जिल्हा नांदेड जिल्हा म्हणून ओळखला जातो. नांदेड शहर आणि १६ तालुके मिळून नांदेड जिल्हा बनलेला आहे. जिल्ह्याच्या उत्तरेस हिंगोली व यवतमाळ जिल्हे, उत्तर-पश्चिम दिशेला परभणी, नैऋतेस लातूर, पूर्व व दक्षिण पूर्व दिशेस तेलंगणा राज्य व दक्षिणेस कर्नाटक राज्य अशी भोगोलिक परिस्थिती आढळते. नांदेड जिल्ह्याचे ऐकूण क्षेत्रफळ १०५०२ चौ. कि.मी. आहे. नांदेड जिल्हा समुद्र सपाटीपासून अधिक अंतरावर वसलेला आहे. त्यामुळे

जिल्ह्याचे हवामान विषम व कोरडे आढळते. जिल्ह्यातील उन्हाळाऋतू अधिक उष्ण, तर हिवाळा अधिक थंड असतात. जिल्ह्यात साधारणत: जून ते सप्टेंबर या कालावधीत नैऋत्य मोसमी वाऱ्यांमुळे पाऊस पडतो. जिल्ह्यातील बहुतांश मृदा काळी व कसदार आढळते. जिल्ह्यातील बहुतांश शेतकरी प्रमुख पिकांत ज्वारी, कापूस, बाजरी, तांदूळ, हरभरा, मूग व तूर इत्यादी पिके घेतात त्याबरोबरच गहू, ऊस, केळी यांचेही उत्पन्न घेतले जाते. त्याचबरोबर शेतकरी गाई, म्हशीचे पालन करून शेतीला पूरक व्यवसाय म्हणून दुधव्यवसाय करताना दिसून येतात.

३) समस्या विधान :-

नांदेड जिल्ह्यातील शेतकरी शेतीबरोबरच दुधव्यवसाय करतात. शेतकरी कुटुंबातील एखादी व्यक्ती आपल्या कुटुंबाला आर्थिक सक्षम करण्यासाठी दुधव्यवसाय करताना दिसते. कारण, शहरीकरणामुळे तसेच जिल्ह्यातील वाढती लोकसंख्या त्यामुळे दुधाची वाढती मागणी लक्षात घेता शेतकरी शेतीसोबत दुधव्यवसाय करतात, असे असले तरी दुधउत्पादक शेतकऱ्यांना आजच्या माहागाईच्या काळात दुधव्यवसाय न परवडणारा व्यवसाय ठरू लागला आहे. कारण, वाढत्या महागाईचा विचार करता दुधाला मिळणारा बाजारभाव कमी आहे. तसेच पशुधनावर होणारा वैद्यकीय खर्चही वाढत चाललेला आहे. मोठ्या शेतकऱ्यांसोबत छोटे शेतकरीसुध्दा हा व्यवसाय करतात; पण जनावरांसाठी लागणारा चारा त्यांना विकत घेऊन जनावरे सांभाळावी लागता, त्यामुळे त्यांचा चाऱ्यासाठीसुध्दा अधिकचा खर्च होतो. वरील सर्व समस्यांची विस्तृत माहिती पुढीलप्रमाणे सांगता येईल.

१) खर्चावर आधारित दुधाचा प्रतिलिटर मिळणारा दर हा असमाधानकारक आहे.

२) शासकीय पशुचिकित्सालयाची कमतरता व असुविधाजनक स्थिती.

३) जनावरांसाठी लागणाऱ्या चाऱ्यांचा वाढता दर.

४) पशुधनावरचा वाढता वैद्यकीय खर्च.

५) पशुसाठी लागणाऱ्या पशुखाद्याच्या वाढत्या किमती.

६) जनावरे वेळेवर गाभण न राहण्याचे वाढते प्रमाण व त्यामुळे शेतकऱ्यांचे होणारे आर्थिक नुकसान.

वरील सर्व समस्यांचा सविस्तर अभ्यास करून समस्यांवर विविध उपाययोजना सुचविण्याच्या हेतूने सदर विषयाची संशोधनासाठी संशोधकान निवड केली आहे.

४) संशोधन महत्त्व :-

शेतकऱ्यांसाठी वरदान असणारा दुधव्यवसाय हा बहुतांश शेतकरी जोडधंदा म्हणून करतात. दुधव्यवसायातून शेतकरी आपला दैनंदिन खर्च भागवत असतो. मानवाच्या आहारातील महत्त्वाचा घटक दूध असल्यामुळे त्याला मागणीही जास्त आहे. त्यामुळे दुधव्यवसायास अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झालेले आहे. नांदेड जिल्ह्यातील बहुतांश शेतकरी शेतीला पूरक व्यवसाय म्हणून हा व्यवसाय करतात, कारण उत्पनाची निश्चित हमी देणारा व्यवसाय म्हणून दुध व्यवसायाकडे पाहिले जाते. दुधउत्पादना सोबत त्यांना शेतीसाठी आवश्यक शेणखतही मिळते. त्याचा फायदा पिक वाढीसाठी होतो. त्यामुळे नांदेड जिल्ह्यातील शेतकरी हे शेतीसोबत जोडधंदा म्हणून दुधव्यवसाय करतात. त्यामुळे त्यांच्या आर्थिक व सामाजिक परीस्थितीचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

५) संशोधनाच्या मर्यादा :-

संशोधकाला निश्चित दिशा मिळण्यासाठी मर्यादा ठरवणे फार गरजेचे आहे. सदर संशोधन हे नांदेड जिल्ह्यातील दुधव्यावसायिक शेतकऱ्यांपुरतेच मर्यादित आहे. ज्यामध्ये जिल्ह्यातील निवडक तालुके व तालुक्यातील शेतकरी जे की, दुधउत्पादनाचा व्यवसाय करतात आणि बहुस्तरीय नमुना निवड पध्दतीनुसार नांदेड तालुक्यातील १०० व इतर तालुक्यातील ४५० असे एकूण ५५० शेतकऱ्यांचा अभ्यास करणार आहे, व संशोधनाचा कालावधी हा सन २०११-१२ ते २०२१-२२ या कालावधी प्रमाणे मर्यादीत राहील.

६) संशोधन अभ्यासाची उद्दिष्टे :

१) उत्पादनखर्चाचा अभ्यास करणे.

२) नांदेड जिल्ह्यातील दुधव्यवसायिकांच्या वितरण प्रणालीचा अभ्यास करणे.

३) नांदेड जिल्ह्यातील दुधउत्पादकांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.

४) दुधाच्या मागणीचा अभ्यास करणे.

५) दुधउत्पादक शेकऱ्यांच्या समस्येचा अभ्यास करणे.

६) निष्कर्ष व शिफारशी मांडणे.

७) संशोधनाचे ग्रहीतके :-

१) नांदेड जिल्ह्यातील दुधउत्पादक शेतकरी दुधव्यवसायापासून आर्थिकदृष्ट्या समाधानी नाहीत.

२) नांदेड जिल्ह्यातील दुधउत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या दुधाला योग्य दर मिळत नाही.

३) दुधव्यवसायामुळे दुधउत्पादक शेतकऱ्यांचे राहणीमान उंचावलेले आहे.

४) नांदेड जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा दुधव्यवसाय हा जोडधंदा आहे.

५) उत्पन्न व खर्चात तफावत आढळून येते.

६) दुधव्यवसाय हा शेतीला पोषक व्यवसाय आहे.

८) नमुना निवड :-

नांदेड जिल्ह्यातील दुधउत्पादक शेतकऱ्यांच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी संशोधकाने बहुस्तरीय नमुना निवड पध्दतीचा वापर केला आहे. बहुस्तरीय नमुना निवड पध्दतीचा वापर करताना तीन स्तर योजले आहेत, प्रथम स्तरात नांदेड जिल्ह्यातील तालुके आहेत, दुसऱ्या स्तरात प्रत्येक तालुक्यातील जास्त दुधउत्पादक शेतकरी असणाऱ्या गावांची निवड करण्यात आली आहे. तर तिसऱ्या स्तरात अशा

शेतकऱ्यांची निवड केली आहे की जे दुधव्यवसाय करतात. नांदेड जिल्ह्यातील एकूण १६ तालुक्यापैकी १० तालुक्यांची निवड करण्यात आलेली आहे. नमुना आकार निश्चिती करताना नांदेड तालुक्यातील १०० नमुना व उर्वरित ९ तालुक्यातील प्रत्येक ५० नमुना याप्रमाणे एकूण ५५० नमुन्यांची निवड करण्यात आलेली आहे.

अनु. क्र.	तालुक्याचे नाव	तालुक्यातील गावांची संख्या	तालुकानिहाय निवडलेले दूध उत्पादक शेतकरी
१	नांदेड	१०	१००
२	लोहा	५	५०
३	कंधार	५	५०
४	नायगाव	५	५०
५	उमरी	५	५०
६	अर्धापूर	५	५०
७	भोकर	५	५०
८	हदगाव	५	५०
९	मुदखेड	५	५०
१०	मुखेड	५	५०
एकूण		**५५**	**५५०**

नांदेड तालुक्यातील दुधव्यवसायिकांच्या नमुना निवडीचे प्रमाण अधिक घेण्याचे कारण हे आहे की, नांदेड शहरात दुधाची मागणी जास्त असल्यामुळे नांदेड तालुक्यातील शहरालगत असणारे दुधव्यवसायिक शेतकऱ्यांचे प्रमाण हे जास्त आहे. त्यामुळे इतर तालुक्यांच्या तुलनेने नांदेड तालुक्यातील नमुन्यांचे प्रमाण अधिक घेण्यात आलेले आहे. माहिती संकलित करताना प्रश्नावली पध्दतीचा अवलंब करण्यात आलेला आहे.

९) संशोधन पद्धती :-

प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे. निष्कर्षाच्या मांडणीसाठी तथ्य संकलन करणे गरजेचे आहे. त्यासाठी योग्य संशोधन पद्धतीचा वापर करणे गरजेचे आहे. प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम अशा दोन्ही पध्दतीचा अवलंब केला जाईल. प्राथमिक तथ्य संकलन पध्दतीत प्रश्नावली व मुलाखत पध्दतीचा वापर केला जाईल तर दुय्यम तथ्य संकलन पद्धतीत वार्षिक अहवाल, जर्नल्स, संदर्भग्रंथ, मासिके, वर्तमानपत्रे, नियतकालिके इत्यादी प्रकाशित साहित्याबरोबर विविध संकेतस्थळांचा सुध्दा वापर केला जाईल.

१०) माहिती विश्लेषणाची तंत्रे :-

प्रस्तुत संशोधनात संकलित केलेल्या माहितीचे विश्लेषण करण्यासाठी त्या माहितीचे वर्गीकरण करून ती माहिती सारणी, आलेख, सरासरी, टक्केवारी इ. विविध सांख्यिकीय साधनांचा वापर विश्लेषणासाठी करण्यात येईल व त्याआधारे निष्कर्ष काढण्यात येतील.

११) संशोधनाची रूपरेषा :

१) प्रस्तावना

२) नांदेड जिल्ह्याचा अभ्यास

३) संशोधन साहित्याचा अभ्यास

४) तथ्य संकलन व विश्लेषण

५) निष्कर्ष व शिफारशी

१२) संदर्भसूची :

१) बळीराजा मासिक-कृषीविज्ञान प्रकाशन, पुणे.

२) दुधव्यवसाय विशेष अंक, पुणे.

३) चव्हाण व भोईटे, ग्रामिण विकासात दुध व्यवसाय.

४) रा. ना. घाटोले, सामाजिक संशोधन पध्दती.

५) प्रदीप आगलावे, सामाजिक संशोधन पध्दती शास्त्र व तंत्रे, साईनाथ प्रकाशन.

६) प्रभाकर जामखेडकर, अधिक दूध देणारी नवी गाय, प्रभा प्रकाशन.

७) डॉ. अनिल कुमार कुलकर्णी, दूध उद्योग, कॉन्टिनेन्टल प्रकाशन.

८) डॉ. उध्दव ससाळे, फायदेशीर दुधव्यवसाय, गोडवा प्रकाशन.

९) प्रा. के. ए. खतीब, महाराष्टाचा भूगोल, के. सागर प्रकाशन.

१३) Webliogaphy :-

१) www.wikipedia.org.

२) www.amul.com

३) www.gokulmilk.coop

संशोधक	**संशोधन मार्गदर्शक**
श्री स्वानंद पंडितराव शिंदे	**डॉ. अतिश उ. राठोड**